लोकमत

न्यूज Inbox

# मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज करा

नागपूर : सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरिता महाडीबीटी पोर्टलवरील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती (फ्रीशिप) या योजनांचे अर्ज ऑनलाइन सादर करण्यासाठी महाडीबीटी पोर्टल कार्यान्वित करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे योजनांचे अर्ज महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाइन भरून घ्यावे तसेच महाविद्यालयाने नोंदणीकृत झालेले अनुसूचित जाती प्रवर्गातील शिष्यवृत्ती योजनेस पात्र असणाऱ्या सर्व मॅट्रिकोत्तर अभ्यासक्रमात प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज तपासणी करून समाज कल्याण कार्यालयाकडे मंजुरीकरिता सादर करावे. अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र लाभार्थी शिष्यवृत्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

Hello Nagpur
Page No. 4 Aug 01, 2024
Powered by: erelego.com